25-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/24/2025 10:40 PM Page 1



## निवडक

### पर्येतील ब्राह्मणी कुलमाया देवीचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २४ : घोलवाडा, पर्ये–सत्तरी येथील श्री ब्राह्मणी कुलमाया देवीचा वार्षिक वर्धापनदिन शनिवार, दि.२६ रोजी विविध धार्मिक,सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी १० वाजता लघुरुद्र,११ वा.आरती व तीर्थप्रसाद, दुपारी १ वा. महाप्रसाद, संध्या.७ वा.भजन, रात्री ८ वा. मोर्ले येथील गटातर्फे समईनृत्य, ९ वा. घोलवाडा पर्ये येथील गटातर्फे दिंडी, रात्री ११ वा. मामा मोचेमाडकर दशावतारी नाट्य कंपनीतर्फे दशावतारी नाटक सादर करण्यात येणार आहे, असे कळविण्यात आले आहे.

-------------------

### मडकईतील साई मंदिराचा वर्धापनदिन उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

बोरी, दि. २४ : संपूर्ण गोव्यातील पहिले श्री साईबाबा मंदिर म्हणून प्रसिद्ध असलेल्या मडकई येथील होसोंवाड्यावरील श्री साई मंदिराचा ४६ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन साजरा करण्यात आला. सदर मंदिर स्व.शांताराम कवळेकर यांनी कुठलीही मदत न घेता स्वखर्चाने श्री साई मंदिराची स्थापना करुन उभारणी केली होती. सकाळी काकड आरतीनंतर भक्तांतर्फे अभिषेक, पूजा, दुपारी श्री सत्यनारायण महापूजा, आरती करण्यात आल्या. संध्याकाळी स्थानिक भजनी कलाकारांतर्फे भजनांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या वेळी यजमान श्री व सौ सुनिता द्वारकानाथ कवळेकर यांच्या तर्फे रोज प्रत्येक गुरुवारी बाबांच्या आरत्या व भजनांची सेवा करणारे श्री साईभक्त राजेश वासु गावडे, उमेश नाईक,विराज नाईक, बुद्धीवान गावडे,तातु धुळापकर, जितेंद्र नाईक, एकानंद् गावडे, उमेश गावडे यांचा श्रीफळ व बाबांची शाल पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तद्नंतर श्री साईबाबांची पालखी फेरी वाड्यावर फिरुन परत मंदिरात आली. नंतर श्रींची महाआरती व महाप्रसाद वाटपाने वर्धापनदिनाची सांगता करण्यात आली. सदर सोहळ्यास गोव्यातील कानाकोपऱ्यातून साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------------

### मदनंत क्रिकेट क्लबचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

सावईवेरे, दि. २४ : सावईवेरे येथील मदनंत क्रिकेट क्लबचा वर्धापनदिन येत्या शनिवार दि. २६ एप्रिल रोजी क्लबच्या सभागृहात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त संध्याकाळी ४ वा. एकनाथ च्यारी व वृंदाली च्यारी यांच्या यजमानपदाखाली श्री सत्यनारायण महापूजा होणार आहे. त्यानंतर ७ वा. भजन, आरती, तीर्थप्रसाद, ८ वा. आमंत्रित बाल घुमट आरती स्पर्धा होणार आहे.

# चेन्नई– हैदराबादसाठी ‘करो या मरो’

## प्ले ऑफसाठी विजय आवश्यक : हेड, अभिषेक शर्माचे चेन्नईसमोर असणार आव्हान

चेन्नई, दि. २४ : चेन्नई सूपर किंग्सचा संघ घरच्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी ओळखला जातो पण यावेळी चेन्नईला पराभवाचा सामना करावा लागत आहे. फिरकी गोलंदाज नूर अहमदच्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर चेन्नईने मुंबई इंडियन्सचा पराभव करून त्यांच्या मोहिमेची चांगली सुरुवात केली होती, परंतु त्यानंतर त्यांची लय बिघडली आणि त्यांना त्यांच्या घरच्या मैदानावर सलग तीन सामने गमावावे लागले. दोन्ही संघ प्रत्येकी सहा पराभवांनंतर गुणतालिकेत अनुक्रमे नवव्या आणि दहाव्या स्थानावर आहेत. उद्या शुक्रवारी प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी सीएसके आणि हैदराबाद चेन्नईत भिडतील.





चेन्नई संघाला कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध नऊ गडी गमावून फक्त १०३ धावा करता आल्या, जी त्याच्या घरच्या मैदानावरील सर्वात कमी धावसंख्या आहे. चेन्नईने त्यांच्या घरच्या मैदानाबाहेर आणि इतर ठिकाणी चांगली कामगिरी केलेली नाही आणि इतर मैदानांवर खेळल्या गेलेल्या चार सामन्यांपैकी फक्त एकच सामना जिंकला आहे. यावेळी त्यांचे फलंदाज चांगली कामगिरी करत नाहीत आणि नियमित कर्णधार ऋतुराज गायकवाड दुखापतीमुळे बाहेर पडल्याने त्यांच्या समस्या वाढल्या आहेत.

महेंद्रसिंग धोनी पूर्णवेळ कर्णधार म्हणून परतला आहे आणि गुडघ्याच्या दुखापती असूनही, कर्णधार म्हणून त्याचे निर्णय खूप महत्त्वाचे आहेत. डेथ ओव्हर्समध्ये त्याची फलंदाजी आणि सामन्याच्या महत्त्वाच्या टप्प्यांवर घेतलेले निर्णय संघाला पुनरागमन करण्यास मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

१७ वर्षीय आयुष म्हात्रे संघात सामील झाला आहे हे चेन्नईसाठी चांगले लक्षण आहे. या तरुण फलंदाजाने मुंबई इंडियन्सविरुद्धच्या पदार्पणाच्या सामन्यात आपल्या फलंदाजीने प्रभावित केले. चेन्नईने त्यांच्या फलंदाजीला बळकटी देण्यासाठी दक्षिण आफ्रिकेच्या डेवाल्ड ब्रेव्हिसलाही त्यांच्या संघात समाविष्ट केले आहे.

सनरायझर्स हैदराबादची कहाणीही अशीच आहे. त्याच्या संघानेही चांगली सुरुवात केली होती पण त्यानंतर, त्याच्या अति आक्रमकतेची मोठी किंमत त्यांना मोजावी लागली. गेल्या हंगामात संघाच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा या स्फोटक सलामी जोडीला यावेळी चांगली कामगिरी करता आलेली नाही, ज्यामुळे संघाची मधली फळीही उघड झाली आहे. चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध सनरायझर्स हैदराबादच्या सलामी जोडीवर सर्वांचे लक्ष असेल. अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड हे गेल्या दोन सामन्यांमध्ये संघाला चांगली सुरुवात देण्यात संयुक्तपणे अपयशी ठरले आहेत. ट्रॅव्हिस हेडने आठ सामन्यांमध्ये दोन अर्धशतके झळकावली आहेत, तर अभिषेक शर्माने या काळात शतक झळकावले आहे. या कामगिरीनंतर, सीएसके विरुद्ध या जोडीकडून चमकदार कामगिरीची अपेक्षा केली जाईल. सनरायझर्स हैदराबादसाठी इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येऊ शकतो. आयपीएल २०२५ च्या पहिल्या सामन्यात शतक केल्यानंतर, त्याला धावा करण्यासाठी संघर्ष करताना दिसून येत आहे. चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध स्फोटक खेळी करून फॉर्ममध्ये परतणे हे त्याचे ध्येय असेल. चौथ्या क्रमांकावर असलेल्या नितीश कुमार रेड्डीकडून वादळी खेळीची अपेक्षा असेल. हेनरिक क्लासेनला पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवले जाईल. मुंबई इंडियन्ससोबत खेळलेल्या शेवटच्या सामन्यात त्याने ७१ धावा केल्या आणि हैदराबादला १४४ धावांपर्यंत पोहोचवण्यास मदत केली. फिनिशरच्या भूमिकेसाठी अनिकेत वर्मा आणि अभिनव मनोहर यांची प्लेइंग इलेव्हनमध्ये निवड केली जाईल.

हैदराबादकडून कर्णधार पॅट कमिन्ससह हर्षल पटेल, जयदेव उनाडकट आणि इशान मलिंगा जलद गोलंदाजीची जबाबदारी सांभाळतील. झीशान अन्सारी फिरकीपटूची भूमिका निभावू शकतो. गेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सविरुद्ध त्यांना सात विकेट्सनी पराभव पत्करावा लागला आहे. जर प्ले ऑफमध्ये प्रवेश करायचा असल्यास उद्याचा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागणार आहे.

### संभाव्य प्रतिस्पर्धी संघ

चेन्नई सुपर किंग्ज : शेख रशीद, रचिन रवींद्र, आयुष म्हात्रे, शिवम दुबे, विजय शंकर, रवींद्र जडेजा, जेमी ओव्हरटन, महेंद्रसिह धोनी (कर्णधार आणि यष्टिरक्षक), नूर अहमद, खलील अहमद, मथिशा पाथिराना, रविचंद्रन अश्विन.

सनरायझर्स हैदराबाद : ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा, इशान किशन, नितीश कुमार रेड्डी, हेनरिक क्लासेन (विकेटकीपर), अनिकेत वर्मा, पॅट कमिन्स (क), हर्षल पटेल, जयदेव उनाडकट, इशान मलिंगा, अभिनव मनोहर.

# केएल राहुलने आयपीएलचा मोठा विक्रम



मुंबई, दि. २४ : केएल राहुलने आयपीएलचा सर्वांत मोठा विक्रम रचला आहे. विशेष म्हणजे त्याने हा विक्रम त्याच संघाविरुद्ध केला आहे जिथे तो गेल्या वर्षीपर्यंत खेळत होता आणि कर्णधार होता. ज्या संघाने केएल राहुलला बाहेरचा रस्ता दाखवला होता, त्यांना केएल राहुलने शब्दांनी नाही तर त्याच्या खेळाने चोख उत्तर दिले आहे. केएल राहुल आता आयपीएलमध्ये सर्वात जलद ५००० धावा करणारा फलंदाज बनला आहे. त्याने डेव्हिड वॉर्नरचा विक्रम मोडला आहे.

आयपीएलमध्ये सर्वात जलद ५००० धावा करण्याचा विक्रम आतापर्यंत डेव्हिड वॉर्नरच्या नावावर होता. त्याने १३५ डावांमध्ये हा टप्पा गाठला होता, परंतु आता राहुलने फक्त १३० डावांमध्ये पाच हजार धावा पूर्ण केल्या आहेत. या यादीत तिसरे नाव विराट कोहलीचे आहे, ज्याने १५७ डाव खेळून पाच हजार धावांचा टप्पा ओलांडला. एबी डिव्हिलियर्सने १६१ आयपीएल डावांमध्ये इतक्या धावा केल्या. शिखर धवनबद्दल बोलायचे झाले तर त्याने १६८ डावांमध्ये पाच हजार धावा केल्या आहेत. केएल राहुलने या संपूर्ण हंगामात शानदार कामगिरी केली आहे. असे म्हटले जाते की त्याला दिल्ली कॅपिटल्सचे कर्णधारपद देण्याची चर्चा होती, परंतु राहुलने स्वतः ते नाकारले आणि अक्षर पटेलच्या नेतृत्वाखाली खेळाडू म्हणून खेळण्याचा निर्णय घेतला. ही चाल राहुलसाठी कामी आली, आता तो उत्तम खेळ दाखवत आहे.

केएल राहुल त्याच्या जुन्या संघाविरुद्ध म्हणजेच लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध शानदार फलंदाजी करत असताना, एलएसजीचे मालक संजीव गोयंका त्याच्याकडे पाहत होते. जेव्हा जेव्हा राहुल चांगली फलंदाजी करत होता तेव्हा कॅमेरा नेहमीच संजीवकडे जात होता. तो खूप निराश दिसत होता. त्याने केएल राहुलला सोडून ऋषभ पंतला २७ कोटींमध्ये आपल्या संघात घेतले, जो सतत अपयशी ठरत आहे. आता संजीव गोयंकाला त्याच्या निर्णयाचा पश्चात्ताप होत असावा.

# मुंबईचा हैदराबादवर शानदार विजय

हैदराबाद, दि. २४ : आयपीएल २०२५ स्पर्धेत मुंबई इंडियन्सला सूर गवसला आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सनरायजझर्स हैदराबादविरुद्ध झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने ७ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. या सामन्यात हैदराबादकडून मिळालेले १४४ धावांचे लक्ष्य मुंबईने ३ गड्यांच्या मोबदल्यात सहज गाठले. या विजयासह मुंबईने गुणतालिकेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला मागे सोडत तिसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. यासह मुंबईचा प्लेऑफमध्ये जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी १४४ धावा करायच्या होत्या. मुंबईची बॅटिंग लाईनअप पाहता, हे आव्हान फार मोठं नव्हतं. मुंबईकडून डावाची सुरूवात करण्यासाठी रायन रिकल्टन आणि रोहित शर्माची जोडी मैदानावर आली. रायन रिकल्टनला या डावात चांगली सुरूवात करून देता आली नाही. तो अवघ्या ११ धावांवर तंबूत परतला. त्यानंतर रोहित शर्माने एक बाजू धरून ठेवली. रोहितने ४६ चेंडूंचा सामना करत ८ चौकार आणि ३ चौकारांच्या साहाय्याने ७० धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर मुंबईने सामन्यावर पकड मजबूत केली. विल जॅक्सने २ षटकार आणि १ चौकाराच्या साहाय्याने २२ धावांची खेळी केली. शेवटी सूर्यकुमार यादवने १९ चेंडूंचा सामना करत नाबाद ४० धावांची खेळी केली आणि संघाला ७ गडी राखून विजय मिळवून दिला.

या सामन्यात सनरायझर्सचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीसाठी आला होता. मात्र या संघाला हवी तशी सुरूवात करता आली नाही. पावरप्लेमध्ये तुफान फटकेबाजी करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या हैदराबादला मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी लागोपाठ धक्के दिले. पावरप्लेमध्येच हैदराबादचे ४ प्रमुख फलंदाज तंबूत परतले होते. हैदराबाद हेनरिक क्लासेनने एकेरी झुंज दिली. त्याने ४४ चेंडूंचा सामना करत ७१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने संघाची धावसंख्या १४३ पर्यंत पोहोचवली.

# रोहित शर्माने रचला नवा विक्रम

## आयपीएलमध्ये १२ हजार धावा करणाऱ्यांच्या यादीत समावेश



मुंबई, दि. २४ : आयपीएलमध्ये रोहित शर्मा फॉर्मात परतला असून त्याची तुफानी फटकेबाजी बुधवारी झालेल्या सामन्यात पहायला मिळाली. रोहित शर्माने सलग दोन अर्धशतके झळकावत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. त्याने पुन्हा एकदा चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडून आपला फॉर्म दाखवला आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला.

रोहित शर्माने सनरायझर्स हैदराबादविरूद्धच्या सामन्यात ४६ चेंडूत ८ चौकार आणि ३ षटकारांसह ७० धावांची आकर्षक खेळी केली. रोहित शर्माने २०१६ नंतर प्रथमच आयपीएलमध्ये लागोपाठ अर्धशतके झळकावली आहेत. रोहित शर्मा आणि सूर्याकूमार यादवच्या फटकेबाजीने मुंबईला पुन्हा एकदा शानदार विजय मिळवून दिला. यादरम्यान रोहित शर्माने दोन मोठे विक्रम आपल्या नावे केले आहेत.

रोहित शर्माने टी–२० क्रिकेटमध्ये १२ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. हा पराक्रम करणारा तो दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. याआधी फक्त विराट कोहलीच टी–२० क्रिकेटमध्ये १२ हजार धावांचा टप्पा गाठू शकला आहे. आता रोहितही खास खेळाडूंच्या यादीत सामील झाला आहे. याशिवाय त्याने कायरन पोलार्डला मागे टाकलं आहे. रोहित शर्माने या सामन्यापूर्वी ४५५ टी–२० सामन्यांमध्ये ११,९८८ धावा केल्या होत्या. म्हणजे तो १२ हजार धावांच्या अगदी जवळ होता. हैदराबादमध्ये सनरायझर्सविरुद्ध खेळताना त्याने १२ हजार धावांचा टप्पा गाठला आहे. सामन्याच्या दुसऱ्या डावात शानदार फलंदाजी करून आणि चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडून त्याने हा खास टप्पा गाठला.

रोहित शर्मा आता मुंबई इंडियन्ससाठी सर्वाधिक षटकार लगावणारा फलंदाज ठरला आहे. त्याने कायरन पोलार्डला मागे टाकत हैदराबादविरूद्ध सामन्यात हा टप्पा गाठला. रोहितच्या नावावर आता मुंबई इंडियन्सकडून २५९ षटकार आहेत, ज्यामध्ये आयपीएल आणि चॅम्पियन्स लीगमधील सामने आहेत. तर त्याने कायरन पोलार्डला मागे टाकले आहे, ज्याच्या नावावर २५८ षटकार आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर सूर्यकुमार यादव आहे ज्याच्या नावावर १२७ षटकार आहेत तर हार्दिक पांड्या ११५ षटकारांसह चौथ्या क्रमांकावर आहे. या यादीत पाचव्या क्रमांकावर इशान किशन आहे ज्याने १०६ षटकार लगावले आहेत, परंतु तो सध्या सनरायझर्स हैदराबादकडून खेळत आहे.

# बुमराहला ‘विस्डन क्रिकेटर ऑफ द इयर’ पुरस्कार

मुंबई, दि. २४ : टीम इंडियाचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह व स्टार महिला क्रिकेटर स्मृती मानधना यांना ‘विस्डन क्रिकेटर ऑफ द इयर’ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बुमराहला पुरुष विभागात, तर मानधनाला महिला विभागात सर्वोत्तम खेळाडू म्हणून जाहीर करण्यात आले. सर्वोत्तम टी–२० खेळाडूचा बहुमान वेस्ट इंडीजचा यष्टिरक्षक फलंदाज निकोलस पुरनला मिळाला.



विस्डन क्रिकेटर ऑफ द इयर’ हा क्रिकेटमधील सर्वात जुना वैयक्तिक पुरस्कार आहे. क्रिकेटसाठी वाहिलेल्या विस्डन’ नियतकालिकाकडून १८८९ पासून दरवर्षी या पुरस्कारांची यादी जाहीर केली जाते. या पुरस्कारासाठी गतवर्षीच्या कामगिरीच्या आधारे निवड केली जाते. कोणत्याच खेळाडूला दोन वेळा हा पुरस्कार दिला जात नाही. बुमराह हा गतवर्षी २० हून कमी सरासरीने २०० कसोटी विकेट टिपणारा पहिला गोलंदाज ठरला होता. त्याने आतापर्यंत ४५ कसोटींत १९.४० च्या सरासरीने २०४ फलंदाज बाद केले आहेत.

न्यूझीलंडचा फिरकीपटू मिचेल सॅण्टनरला ‘विस्डन’ने सर्वोत्तम कामगिरीबद्दल सन्मानित केले. गतवर्षी भारत दौऱ्यावर पुणे कसोटीत १३ विकेट टिपल्याबद्दल विस्डन’ने त्याच्या कामगिरीची दखल घेतली. न्यूझीलंडने तीन कसोटी सामन्यांची ही मालिका ३–० फरकाने जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली होती.

# स्व. शिरोडकर क्रिकेट स्पर्धेत अभियांत्रिकी महाविद्यालयाची बाजी

## राज्यातील २२ महाविद्यालयांचा सहभाग; साखळी सरकारी महाविद्यालयातर्फे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. २४ : येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाच्यावतीने राज्यातील महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांसाठी चौथी स्व. आलोक शिरोडकर स्मृती हेवी क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्व. आलोक शिरोडकर हे साखळी सरकारी महाविद्यालयातील माजी क्रीडा शिक्षण होते. त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेत राज्यातील एकूण २२ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. यामध्ये अंतिम सामन्यात फर्मागुढी येथील आभियांत्रिकी महाविद्यालयाने बाजी मारली. तर धेंपे चॅरिटीज ट्रस्टचा संघ उपविजेता ठरला.

स्वर्गीय आलोक प्रदीप शिरोडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. साखळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी दिवंगत आलोक यांचे वडील प्रदीप शिरोडकर यांचेही मनोगत झाले. समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून साखळी येथील प्रोग्रेस हायस्कूलचे क्रीडा शिक्षक प्रसाद शिवानंद सुर्लाकर, उपप्राचार्या प्रीती पेडणेकर, प्रदीप शिरोडकर आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे क्रीडा संचालक साईश गोलतेकर आणि शारीरिक प्रशिक्षक डोराथी आलन्सो यांनी या स्पर्धेचे संयोजन केले. कृतिका नावेलकर यांनी समारोपसत्रात आभार मानले.

### वैशिष्ट्यपूर्ण खेळाडू आणि महाविद्यालयांचा गौरव

**उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाविद्यालयाच्या शैक्षणिक विभागाच्या उपप्राचार्य प्रीती पेडणेकर यांच्याहस्ते खेळाडूंचा गौरव करण्यात आला. अंतिम सामन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून नमित काणकोणकर (जीईसी) यांना गौरविण्यात आले तर उमेश गावडे (जीईसी) यश प्रभुगावकर, तर सर्वोत्कृष्ट शिस्त संघाचा पुरस्कार मांद्रे कॉलेज ऑफ कॉमर्स इकॉनामिक्स आणि मॅनेजमेंटला देण्यात आला.**

--------------

### ’आलोक’ क्रीडा संस्कृतीतील आदर्श व्यक्तिमत्त्व : प्राचार्य गावस

**साखळी सरकारी महाविद्यालयाच्या क्रीडा संस्कृतीतील आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वर्गीय आलोक प्रदीप शिरोडकर होय, त्यांनी आपल्या वर्तनातून क्रीडा जगतात कसे आचरण असावे, याचे संस्कार पेरले. त्यामुळेच आलोक प्रदीप शिरोडकर हे महाविद्यालयाच्या क्रीडा संस्कृतीचे आत्मा होते, असे प्राचार्य नामदेव गावस यांनी सांगितले.**

# आयडीसीची २४ औद्योगिक वसाहतींसाठी बहुआपत्ती निश्चितीकरण, व्यवस्थापन योजना

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २४ :** राज्यातील सर्व २४ औद्योगिक वसाहतींसाठी एक व्यापक मल्टी–हझार्ड मॅपिंग (बहु–आपत्ती निश्चितीकरण) आणि आपत्ती व्यवस्थापन योजना विकसित करण्यासाठी गोवा औद्योगिक विकास महामंडळाने (गोवा–आयडीसी) पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या पर्यावरण शिक्षण केंद्रासोबत (सीईई) सहकार्य करार केला आहे. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून, बिट्स पिलानी येथे एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत राज्यातील औद्योगिक वसाहतींचे इस्टेट व्यवस्थापक, गोवा–आयडीसीचे पदाधिकारी आणि औद्योगिक वसाहती संघटनांचे प्रतिनिधी एकत्र येऊन पुढील उद्दिष्टे आणि कृती आराखड्यावर विचारमंथन केले. गोवा–आयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रविमल अभिषेक यांनी सांगितले की, आयडीसी–कनेक्ट उपक्रमातील एका कार्यक्रमामध्ये उद्योग प्रतिनिधींनी औद्योगिक वसाहतींमधील संभाव्य विविध धोक्यांबाबत चिंता व्यक्त केली होती. यातूनच या प्रकल्पाची कल्पना उदयास आली. जरी राज्यातील २% पेक्षा कमी जमीनक्षेत्र उद्योगांनी व्यापलेले असले तरी, राज्याच्या अर्थव्यवस्थेत उद्योगक्षेत्राचा वाटा सुमारे ३०% आहे. गोव्यात २४ औद्योगिक वसाहती आहेत. प्रत्येक वसाहतीमध्ये आव्हानांचे स्वरूप वेगवेगळे आहे. कुंडई वसाहतीला भेडसावणारे धोके हे वेर्णा औद्योगिक वसाहतीमधील धोक्यांपेक्षा वेगळे आहेत, असे ते म्हणाले. अरण्य पर्यावरण संशोधन संस्थेचे संशोधन विभागप्रमुख प्रणय वैद्य यांनी धोक्याची तीव्रता, व्यापकता निश्चित करण्यासाठी स्थानिक जैवविविधता कशा प्रकारे महत्त्वाची भूमिका बजावते हे स्पष्ट केले. काही गवताच्या प्रजातींमध्ये लिग्निन या घटकाचे प्रमाण अधिक असल्याने त्यांना आग लागण्याची शक्यता अधिक असते, तर काही प्रजातींमध्ये आगीला प्रतिरोध करण्याची क्षमता अधिक असते, असे त्यांनी नमूद केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३२ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 232 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .